औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार
दिनांक ३०.११.९३ रोजी झालेल्या ८८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. व्यंकटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणाकर | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ४] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना विभाग, औरंगाबाद. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ५] श्री. आर. टी. गायकवाड शहर अभियंता [म. न. पा. औबाद] आयुक्त म. न. पा. औरंगाबाद यांचे सदस्य प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी |

विषय क्र. १: दिनांक १२.१०.९३ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

मंडळाच्या ८७ व्या बैठकीतील आयत्यावेळचा विषय क्र. १ व ठराव क्र. ५२१ वर चर्चा करतांना उपसभापती औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास सांगितले की, तिसगांव येथील गट क्र. १०४/१ या जमिनीवर स्टोन क्रशर असल्याने धुळीचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे योजना राबवावी किंवा कसे या संबंधीचा मुद्दा मांडला.

उपसभापतींनी सांगितले की, स्टोन क्रशर हलविण्यासाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे ब-याच वेळा बैठका झाल्यात परंतु क्रशर हलविण्यासाठी अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. यासंबंधात वाळूज परिसरात सिडको स्थानिक नियोजन प्राधिकरण असल्याने सिडकोशीही चर्चा केलेली आहे असे उपसभापतींनी मंडळास सांगितले.

यावर चर्चा करतांना श्री. दे. हि. मुन उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी असे विचारले की, धुळीच्या प्रदुषणामुळे किती गाळे कमी होतात. तेवढे गाळे कमी करुन बांधकाम करावे.

यावर चर्चेच्या ओघात मंडळाच्या सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, गाळ्यांच्या योजना राबवावी व योजना पूर्ण झाल्यानतर लोकांचा दबाव निर्माण होईल व पर्यायाने स्टोन क्रशर हलविणे भाग पडेल.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सदस्य श्री. व्यकंटराव देशपांडे यांनी अशी सुचना केली की, स्टोन क्रशरवाल्यानां मंडळातर्फे नोटीस देण्यांत याव्यात. यासंबंधात उपसभापतींनी सांगितले की, मंडळाला नोटीस देण्यासंबंधी कायदेशीर आधार नाही.

यावर चर्चा करतांना मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२४
----------

मंडळाच्या ८७ व्या बैठकीतील ठराव क्र. ५२१ च्या अधिन राहून तिसगांव येथील विविध उत्पन्न गटातील योजना कार्यान्वीत करावी. या योजनेचे बांधकामाचे दृष्टीने सत्वर कार्यवाही करावी.

ठराव क्र. ५२५
----------

औरंगाबाद मंडळाच्या दिनांक १२. १०. ९३ रोजी झालेल्या ८७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतवर सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: गेवराई जि. बीड येथील सर्वे क्र. ५३ [भाग] वरील अल्प उत्पन्न गटांतर्गत २२६ गाळे, मध्यम उत्पन्न गट-१ अंतर्गत ६८ गाळे व मध्यम उत्पन्न गट-२ अंतर्गत ४१ गाळ्यांच्या योजनेबाबत.
----------

मा. उपसभापती, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास या विषयाची बाब टिप्पणी वाचुन दाखविली व या विषयाची विस्तृत माहिती करून दिली.

या विषयावर चर्चा करतांना मा. सभापती यांनी सांगितले की, गेवराई नगरपरिषदेने सन १९८९-९० मध्ये योजना जाहीर करून पैसे जमविले होते. त्यावेळी योजना सुरू झाली नाही. म्हणून कदाचित

लोकांचा मंडळाने दिलेल्या जाहिरातीवर विश्वास नसावा. परंतु मंडळाने आता अल्प उत्पन्न गटांतर्गतच्या कमीत कमी ५० घरांची योजना राबविल्यास लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल व योजनेस मागणी येईल.

जाहिरात देतांना भूकंपापासून संरक्षित, भूकंपाचे धक्के सहन करणारे घर अशा स्वरूपाची प्रसिध्दी देण्यांत यावी. पुर्वीच्या अंदाजपत्रकापेक्षा या गाळ्यांची किंमत वाढणार आहे व ती कशा मुळे वाढणार आहे असे स्पष्ट जाहिरातीत नमुद करण्यांत यावे.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२६

गेवराई येथे ५० अल्प उत्पन्न गटातील घरांची योजना कार्यान्वीत करण्यांत यावी व त्यासंबंधीची योग्य ती कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी.

विषय क्र. ३: गृहनिर्माण भवनाजवळील उच्च उत्पन्न गटांतर्गत १६ गाळ्यांचे बांधकाम

वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांच्या निरिक्षण पथकाने वर्ष १९८८-८९ करिता केलेला लेखा परिक्षण अहवाल.

मंडळाने या विषयावर चर्चा करून असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२७

गृहनिर्माण भवनाजवळील उच्च उत्पन्न गटांतर्गत १६ गाळ्यांच्या योजनेच्या कंत्राटदारांकडून बँक गॅरंटीचे रोखीकरण न करण्यांत आल्याबाबत व त्यासंबंधीची माहिती मंडळाने करून घेतली व त्याची नोंद सर्व सदस्यांनी घेतली.

विषय क्र. ४: सिडको नविन औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ५० गाळे, मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६८ व ८८ गाळ्यांच्या बांधकामाबाबत.

---

या विषयाची बाब टिप्पणी उपसभापतींनी मंडळास वाचुन दाखविली तसेच उपरोक्त योजनांचे बांधकाम चालु करण्याचे आदेश देण्यापुर्वी गाळ्यांच्या ठोस मागणीबाबतचा आढावा घेण्यांत यावा व नंतरच बांधकाम चालु करण्याबाबतचे आदेश देण्यांत यावेत असे कार्यकारी अभियंताऔरंगाबाद मंडळ यांना कळविण्यांत आलेले आहे असे उपसभापतींनी सांगितले.

बाब टिप्पणीतील इतर बाबींचा विचार करता व पुन्हा जाहिरात दिलेली आहे व त्यास प्रतिसाद मिळत आहे, करिता वरील योजनेचे बांधकाम आदेश देण्यांत यावे असे मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२८

सिडको नविन औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटातील ५० गाळे, आर ४८, एन-७, मध्यम उत्पन्न गट ६८ गाळे आर-२६ एन-९ व ८८ गाळे आर-२७ एन-९ या योजनेच्या बांधकामाचे आदेश [वर्क ऑर्डर] ठेकेदारांना देण्यांत यावे.

विषय क्र. ५: असाधारण परिस्थिती केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या परिपुर्ती करणेबाबत.

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५२९

श्री. तुळणकर यांनी त्यांच्या पत्नीच्या ऑपरेशन व आजारपणावर रु. ८,९१५ खर्च केलेला आहे. त्यापैकी त्यांना रु. ६,४१०/- ची परतफेड प्राधिकरणाच्या नियमाच्या अधिन राहून मंडळ मान्यता देत आहे.

विषय क्र. ६: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती करणेबाबत.

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३०

---

श्री. डी. डी. चिक्षे शाखा अभियंता यांनी त्यांच्या पत्नीच्या बाळंतपणाच्या ऑपरेशनवर रू. ८, ६२४. ६२ इतका खर्च केला आहे तसेच श्री. चिक्षे यांनी त्यांच्या मुलीच्या आजारावर रू. ४, ८०५. ५० इतका खर्च केला आहे.

वरील रक्कमेपैकी नियमाप्रमाणे अनुक्रमे रू. ६, ००२/- व रू. ३, ३७५/- इतकी रक्कम देय्य आहे.

श्री. चिक्षे यांना वरील दोन्ही रक्कमा या प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधीन राहून अदा करण्यास मंडळ मान्यता देत आहे.

विषय क्र. ७: औरंगाबाद येथील सर्वे क्रमांक ७ वर बांधण्यांत आलेल्या ८३/८२ गाळ्यांच्या योजनेस पाणीपुरवठा करणेबाबत.

---

या विषयावर चर्चा करतांना मंडळासमोर सादर केलेली बाब टिप्पणी मंडळास वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, मुकुंदवाडी येथील मंडळाचे गाळे तयार आहेत परंतु पाण्या अभावी गाळे रिकामे आहे. त्यासाठी मंडळाने एम. आय. डी. सी. कडे संपर्क साधला असता त्यांनी खालील गोष्टीस संमती मागितली आहे.

१] कॅपीटल कॉन्ट्रीब्युशन म्हणून रू. ५०००/-प्रती घन मीटर प्रमाणे एकुण ४१. ५० घनमिटरसाठी रू. २, ०७, ५००/-एम. आय. डी. सी. कडे भरावे लागतील.

२] एम. आय. डी. सी. च्या जोडणी स्थळापासून योजनेच्या भूमीगत जुलकुंभापर्यन्तचा पाईप लाईनचा खर्च मंडळास करावा लागेल.

३] पाण्याचा दर रू. ४. ८० प्रती घनमीटर या दराने असेल.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, औरंगाबाद महानगरपालिकेकडून पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. मनपा आयुक्त यांचे सदस्य प्रतिनिधीस सांगितले की, मुकूंदवाडी च्या इतर भागातील पाणी वाटपासंबंधी काटकसर करून मंडळाच्या योजनेस पाणीपुरवठा करता येईल.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३१
------------

मुकूंदवाडी येथील ८३ गाळ्यांच्या पाणीपुरवठ्यासाठी एम. आय. डी. सी. कडे खालील बाबीसंबंधी मंडळाची संम्मती कळविण्यांत यावी.

१] कॅपीटल कॉंट्रीब्युशन म्हणून रू. ५०००/- प्रति घन मिटर प्रमाणे एकुण ४१.५० घनमिटरसाठी रू. २,०७,५००/- एम. आय. डी. सी. कडे भरावेत.

२] एम. आय. डी. सी. च्या जोडणी स्थळापासून योजनेच्या भुमीगत जलकुंभापर्यन्तच्या पाईपलाईनचा खर्च मंडळाने करावा.

याप्रमाणे एम. आय. डी. सी. कडे मंडळाची संम्मती कळवावी. तसेच महानगरपालिका औरंगाबादकडून पाणी मिळण्यासाठी प्रयत्न करावा.

विषय क्र. ८४ मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणाच्या कामासाठी सेक्युरिटी सर्व्हीसेस नेमण्याबाबत.

.....

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास बाब टिप्पणी वाचून दाखविली व मंडळास माहिती दिली की, गृहनिर्माण भवनाच्या रक्षणासाठी चौकीदार नेमले होते त्यापैकी एक चौकीदार अचानक वारला व दोन चौकीदार हे सेवानिवृत्त झालेले आहे. त्यामुळे कार्यालयाच्या रक्षणाचे काम एका मजदुराकडून घेण्यांत येत आहे. एका व्यक्तीकडून २४ तास सेवा करून घेणे हे बरोबर नाही.

या अनुषंगाने उपसभापतींनी मंडळास सांगितले की, खाजगी सेक्युरिटी संस्थांकडून गृहनिर्माण भवनाचे रक्षण करून घेण्यासाठी निविदा मागविलेल्या आहेत. त्यापैकी मेडोवर्स व अंजिठा सेक्युरिटी प्रा. लि. या संस्थेचे अटी व शर्तींचा विचार करता सदर संस्थेस गृहनिर्माण भवनाच्या रक्षणासाठी प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूक करण्यांत यावी.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या कार्यालयाचे रक्षण करणे हे महत्वाचे काम आहे. कारण कार्यालयात महत्वाच्या व मौल्यवान वस्तु असतात त्यामुळे कार्यालयाचे रक्षण करण्यासाठी खाजगी सेक्युरिटी संस्थांची नेमणूक करण्यांत यावी.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५३२

---

औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयाचे रक्षणाचे काम अत्यंत महत्वाचे असल्यामुळे व मंडळाकडे सध्या कोणीही चौकीदार नसल्याने मेडोवर्स व अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. या खाजगी सेक्युरिटी संस्थेकडून रु. १८००/- दरमहा या प्रमाणे तीन चौकीदाराची नेमणूक करावी व प्रस्ताव प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरीसाठी पाठवावा. जर प्राधिकरणाने मान्यता न दिल्यास सदर संस्थेच्या चौकीदारांची नेमणूक रद्द करण्यांत येईल असे त्यांना कळविण्यांत यावे.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

.....